**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## स्वातंत्र्यदिन सोहळा

### राजगुरू महाविद्यालय

**राजगुरूनगर, (वार्ताहर)** : येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांचा हस्ते स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने संचलन करण्यात आले. हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत राजगुरुनगर शहरातून राष्ट्रीय सेवा योजना विभाग व खेड पोलीस स्टेशन यांच्या वतीने जनजागृती फेरी काढण्यात आली.

उपस्थितांना मतदान जागृतीबद्दलची शपथ देण्यात आली. कनिष्ठ विभागाच्या वतीने स्वातंत्र्यदिन विशेषांक या भित्तिपत्रकाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी संस्था संचालक, प्राचार्य, सर्व प्राध्यापक शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.



# राजगुरुनगरमध्ये प्रभात फेरी

राजगुरुनगर, ता. १६ : येथे स्वातंत्र्य दिन उत्साहाने साजरा केला. विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी काढल्या. ठिकठिकाणी विद्युत रोषणाई केली होती. हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत जनजागृती रॅली काढली.

खेड तहसील कार्यालयाच्या प्रांगणात शासकीय झेंडावंदन उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांच्या हस्ते झाले. तहसीलदार ज्योती देवरे, पोलिस निरीक्षक राजकुमार केंद्रे, नायब तहसीलदार मदन जोगदंड, ज्ञानेश्वर शेळकंदे, राम बीजे, डी. पी. माळी, मनीषा खैरे आदी उपस्थित होते. या वेळी खेड पोलिस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी संचलन केले. महसूल पंधरवडा उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार केला.

खेड जिल्हा सत्र न्यायालयात जिल्हा न्यायाधीश ए. एस. सय्यद यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. तसेच, येथील पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आवारात आमदार दिलीप मोहिते यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. राजगुरुनगर पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षक राजकुमार केंद्रे यांच्या हस्ते ध्वज फडकविण्यात आला.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या जन्मस्थळ वाड्यावर झेंडावंदन भीमाशंकर देवस्थान संस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे यांच्या हस्ते केले. राजगुरुनगर नगरपरिषदेत मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्या हस्ते ध्वजवंदन केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयात खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन झाले. या प्रसंगी राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने संचलन केले.

जिल्हा परिषदेच्या क्र.१ व क्र. २ शाळांनी प्रभातफेरी काढली. महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बॅण्डपथकांसह गावातून प्रभात फेरी काढली. विद्यालयात सचिव गणेश जोशी यांच्या हस्ते झेंडावंदन केले. अध्यक्ष हरिभाऊ सांडभोर व संचालक मंडळ उपस्थित होते. सार्वजनिक वाचनालयात मानद सचिव राजेंद्र सुतार यांच्या हस्ते ध्वजवंदन केले.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख